cmyk

SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी

संपादक : वैभव विवेक स्वामी

● vaibhav11swami@gmail.com
● beedshivvani@gmail.com
● Mo.9422748792/ 9822628521
● SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

प्रिय पालक बंधूंनो आणि १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थी मित्रांनो मेडिकल, इंजिनिअरींगला प्रवेश मिळाला नाही तरी काळजी करु नका..! चिंता करु नका..! **१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक (फूड टेक) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर ही उच्च पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास नोकरीची संधी.**

**२००४ पासून आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट**



"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू)

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त

**अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय**

म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड - ४३१ १५३

कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - 16177 आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - 11293.

फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे

ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. 25 जुलै 2026

प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टँड समोर, बीड - 431 122
संपर्क क्र. :- 9420025052 / 9763434504 / 9970842014 / 7588082034 / 9941001212



| बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२९ | सोमवार, दि.२० जुलै २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -29 | Monday, Dt. 20 july 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4 |



## स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीला शासकीय मान्यता..!

# राज्य शासनाचा ऐतिहासिक निर्णय..!!



### राज्याच्या विकासात योगदान देणाऱ्या नेतृत्वाचा गौरव; शासकीय व निमशासकीय स्तरावर जयंती साजरी करण्याबाबत शासन आदेश

**बीड । वैभव स्वामी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत, त्यांची जयंती शासकीय व निमशासकीय स्तरावर साजरी करण्याबाबत शासन आदेश जारी केला आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक जीवनात योगदान देणाऱ्या नेतृत्वाच्या कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.**

राज्याच्या विकास प्रक्रियेत प्रशासनातील निर्णयक्षमता, वित्तीय शिस्त, पायाभूत सुविधा, सिंचन, उद्योग, शेती आणि ग्रामीण विकास यांसारख्या क्षेत्रांत अजित पवार यांनी केलेल्या योगदानाची दखल घेत हा निर्णय घेण्यात आल्याचे मत समर्थक व्यक्त करीत आहेत. त्यांच्या कार्याची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, विकासाभिमुख नेतृत्वाची प्रेरणा समाजाला मिळावी आणि सार्वजनिक जीवनातील योगदानाचा सन्मान व्हावा, या उद्देशाने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून राज्याच्या राजकारणात प्रभावी भूमिका बजावणारे अजित पवार यांनी प्रशासनातील गतिमान निर्णय, विकासकामांवरील भर आणि वित्तीय व्यवस्थापनामुळे स्वतंत्र छाप निर्माण केली आहे. त्यांच्या जयंतीला अधिकृत स्वरूप मिळाल्याने विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये ◀◀ पान २ वर

#### सरकारच्या या निर्णयाचे स्वागत-वैभव स्वामी

सार्वजनिक जीवनात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याची शासनाची परंपरा अधिक समृद्ध करणारे हे पाऊल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारने घेतला असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....



### सेमिकॉन २.० ला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी..

नवी दिल्ली : भारताला जागतिक सेमिकंडक्टर उत्पादन केंद्र बनविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने 'सेमिकॉन २.०' योजनेस मंजुरी दिली आहे. या योजनेसाठी सुमारे १.२७ लाख कोटींची तरतूद करण्यात आली असून चिप उत्पादन, संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि देशांतर्गत उद्योगांना मोठे प्रोत्साहन मिळणार आहे. या निर्णयामुळे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन वाढण्याबरोबरच लाखो रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### मोबाईल उत्पादन वाढीसाठी नवी प्रोत्साहन योजना..

नवी दिल्ली : देशात मोबाईल उत्पादन वाढवून निर्यातीत मोठी झेप घेण्यासाठी केंद्र सरकारने नव्या उत्पादन प्रोत्साहन योजनेस मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत तसेच परदेशी कंपन्यांची गुंतवणूक वाढेल. अत्याधुनिक उत्पादन केंद्रे उभारली जाणार असून 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला यामुळे अधिक बळ मिळणार आहे.




### युरिया गुंतवणूक धोरण २०२६ मंजूर

नवी दिल्ली : देशातील खत उत्पादन वाढवून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय युरिया गुंतवणूक धोरण-२०२६ मंजूर केले आहे. या निर्णयामुळे नव्या खत प्रकल्पांना चालना मिळणार असून शेतकऱ्यांना वेळेवर युरियाचा पुरवठा होण्यास मदत होईल. कृषी क्षेत्र मजबूत करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात आहे.



### रेल्वे पायाभूत सुविधांच्या विस्ताराला मंजुरी

नवी दिल्ली : देशभरातील रेल्वे मार्गांचे आधुनिकीकरण, दुहेरीकरण आणि क्षमतावाढीसाठी केंद्र सरकारने अनेक रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक अधिक वेगवान होणार असून उद्योग, व्यापार आणि पर्यटनालाही चालना मिळणार आहे. रेल्वे नेटवर्क अधिक सक्षम करण्यावर सरकारचा भर आहे.



### वाराणसी एलिव्हेटेड कॉरिडॉरला हिरवा कंदील

नवी दिल्ली : वाराणसी शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी गंगा परिसरात एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे शहरातील प्रवास अधिक सुलभ होणार असून पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. आधुनिक शहरी विकासाच्या दिशेने हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

## पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिमेचे उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बाजारपेठांच्या विस्तारामुळे प्लास्टिक कचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ३० दिवसांची विशेष एकल वापर प्लास्टिक बंदी (सिंगल युज प्लास्टिक) मोहिम राबविली जात आहे. या मोहिमेचे अधिकृत उद्घाटन पर्यावरण, वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. ◀◀ पान २ वर

## शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीज बिल थकबाकी माफ करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई। प्रतिनिधी**

**राज्य शासनाने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंत कृषीपंपांचे वीजबील माफ केले आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांच्या नावावर पूर्वीची थकबाकी कायम असल्याने त्यांना नवीन वीज जोडणी घेण्यास अडचणी येत आहेत. यासाठी ४८ हजार कोटी रुपयांचे पूर्वीचे थकीत वीजबील माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिल्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तुलसीहार, विठ्ठल- मूर्ती आणि बैलगाडीची प्रतिकृती भेट देऊन यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सन्मान करण्यात आला. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, आमदार रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, रणधीर सावरकर, संजय कुटे, खासदार अनिल बोंडे तसेच राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सन्मान



## शासनाकडे पाहण्याचा नागरिकांचा दृष्टिकोन सेवांवरच अवलंबून-राज्य आयुक्त सुधाकर तेलंग

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

शासनाकडे पाहण्याचा नागरिकांचा दृष्टिकोन हा प्रशासनाने दिलेल्या सेवांवरूनच ठरत असतो, याचा विचार करुन शासनाची प्रतिमा अधिकाधिक उंचावण्यासाठी सर्व अधिसूचित सेवा विहीत वेळेतच नागरिकांपर्यंत पोहोचवाव्यात, अशा सूचना राज्य सेवा हक्क आयोगाचे पुणे विभागाचे राज्य आयुक्त सुधाकर तेलंग यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अन्वये ◀◀ पान २ वर




## बालकांना २३ वर्षांपर्यंत बालगृहात राहण्याची मुभा

### प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश-मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

कोविड-१९ संसर्गामुळे अनाथ झालेल्या आणि ज्यांच्या संगोपनासाठी कुटुंबातील सदस्य अथवा नातेवाईक इच्छुक नाहीत, अशा बालकांना २३ वर्षांपर्यंत बालगृहात राहण्याची मुभा देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

सध्या अशा बालकांना २१ वर्षांपर्यंत बालगृहात राहण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र शिक्षण, उच्च शिक्षण आणि स्वावलंबनासाठी अधिक कालावधीची गरज लक्षात घेऊन ही वयोमर्यादा २३ वर्षांपर्यंत वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ◀◀ पान २ वर

## चरणसेवेने वारकऱ्यांचा प्रवास झाला सुखकर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत 'चरणसेवा' उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे.**

या उपक्रमांतर्गत मातोश्री आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, कोकाटे वस्ती, कर्जुळे हर्या, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांच्या माध्यमातून आणे येथे श्री रंगदास स्वामी पायी दिंडी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सुमारे १९० वारकरी सहभागी झाले. त्यापैकी १०६ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच १०६ वारकऱ्यांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. याशिवाय ८० वारकऱ्यांना आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने ◀◀ पान २ वर

● *उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पाठपुरावा*

## बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी निधी

**मुंबई प्रतिनिधी**

बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास आणि निधी मंजुरीस आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात या क्रीडा संकुलाच्या उभारणीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली



होती. उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या क्रीडा संकुलाच्या निधीसाठी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळेच हा मार्ग मोकळा झाला आहे. बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात ◀◀ पान २ वर

#### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विशेष पुढाकार..

बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि स्थानिक तरुण खेळाडूंना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुरुवातीपासूनच आग्रही होत्या. या संकुलाच्या निधी वितरणात व प्रशासकीय मंजुऱ्यांमध्ये येणारे अडथळे दूर करून, अंदाजपत्रकाला मंत्रिमंडळाची अंतिम कार्योत्तर मान्यता मिळवून देण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मंत्रिमंडळाच्या आजच्या या निर्णयामुळे बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या उर्वरित कामांना मोठी गती मिळणार असून, या भागातील क्रीडा संस्कृतीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला तालुका क्रीडा संकुल उभारणीचा आढावा




**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंच्या कौशल्याला वाव मिळण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळणे अत्यंत गरजेचे आहे, तरी जिल्ह्यातील प्रलंबित तालुका क्रीडा संकुलांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या जागेबाबतच्या कामांच्या प्रक्रीयेला समन्वयातून गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुका क्रीडा अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते. बैठकीत परळी, शिरुर, आष्टी, पाटोदा, धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलांच्या जागेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाटोदा, आष्टी व शिरुर या तालुक्यांच्या ठिकाणी क्रीडा संकुलासाठी पर्यायी जागा उपलब्ध आहे का, याची चाचपणी केली. या ठिकाणी नवीन गायरान जमिनीचा शोध घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव ◀◀ पान २ वर

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

cmyk

SHIV VANI
शिव वाणी
संपादकीय
2
सोमवार, दि.२० जुलै २०२६
Monday, Dt. 20 july 2026

## अग्रलेख....

## 'नीट'च्या निकालाने दाखवून दिले... गुणवत्तेला बदनाम करता येत नाही.!

बीड : राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) गेल्या काही वर्षांत केवळ एक परीक्षा राहिलेली नाही. ती वाद, आरोप, न्यायालयीन लढाया, पेपरफुटीच्या चर्चा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणाचे प्रतीक बनली आहे. प्रत्येक वर्षी निकालानंतर गुणवत्तेपेक्षा गैरप्रकारांचीच चर्चा अधिक होते. दुर्दैवाने, याचा सर्वाधिक फटका प्रामाणिक विद्यार्थ्यांना बसतो. मेहनतीच्या जोरावर यश मिळवणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वावर संशयाची सावली पडते. मात्र, यंदाच्या निकालाने एक गोष्ट पुन्हा स्पष्ट केली आहे. गुणवत्तेला कायमस्वरूपी बदनाम करता येत नाही.

महाराष्ट्रावर अनेकदा अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जाते. कधी कट-ऑफचा मुद्दा, कधी प्रश्नपत्रिकेतील त्रुटी, तर कधी गुणवंत विद्यार्थ्यांबाबतचा गैरसमज. तरीही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी यंदा उल्लेखनीय यश संपादन करून राज्याची शैक्षणिक परंपरा जिवंत असल्याचे सिद्ध केले आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी अत्यल्प सुविधांमध्ये, आर्थिक अडचणींवर मात करत राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केली आहे. हे यश केवळ त्यांच्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जिद्दीचे प्रतीक आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाइतकेच शिक्षकांचे आणि मार्गदर्शन संस्थांचेही मोठे योगदान आहे. विशेषतः अनेक वादग्रस्त क्लासेसने सातत्यपूर्ण निकालाची परंपरा कायम राखत अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार करण्यासाठी सक्षम मार्गदर्शन केले आहे. केवळ गुण मिळवून देणे नव्हे, तर नियोजन, आत्मविश्वास, शिस्त आणि स्पर्धात्मक तयारीची संस्कृती रुजविण्यात अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यांच्या यशामुळे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

तथापि, या यशाच्या आनंदात काही प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाहीत. नीट परीक्षेभोवती निर्माण होणारे वाद, पारदर्शकतेबाबतचे प्रश्न आणि विद्यार्थ्यांवरील मानसिक दडपण यावर केंद्र सरकार, राष्ट्रीय परीक्षा संस्था (छढ-) आणि संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेवर समाजाचा विश्वास टिकविणे ही सरकारची जबाबदारी आहे.

आज गरज आहे ती यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याची आणि त्यांच्या मेहनतीला योग्य न्याय देण्याची. प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्याकडे संशयाने पाहण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. काही मोजक्या गैरप्रकारांमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टांवर प्रश्नचिन्ह उभे करणे हा अन्याय आहे.

यंदाच्या नीट निकालाने एक संदेश स्पष्ट दिला आहे. वाद तात्पुरते असतात, पण गुणवत्ता चिरंतन असते. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आणि त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की प्रामाणिक परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि जिद्द यांना पर्याय नाही. हे यश केवळ गुणांचे नाही; ते विश्वास, चिकाटी आणि गुणवत्तेच्या विजयाचे प्रतीक आहे. अशीच गुणवत्ता देशाच्या वैद्यकीय क्षेत्राला सक्षम डॉक्टर आणि समाजाला संवेदनशील नागरिक देत राहील, हीच अपेक्षा.

पान १ वरून....

### राज्य शासनाचा ऐतिहासिक

त्यांच्या कार्याचा परिचय करून देणारे कार्यक्रम, व्याख्याने, चर्चासत्रे आणि जनजागृती उपक्रम आयोजित करण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे बोलले जात आहे.

---------------

### पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते

एकल वापर प्लास्टीक बंदी विशेष मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांच्यासह संबंधित यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

--------

### बालकांना २३ वर्षांपर्यंत बालगृहात

मंत्रालयात आयोजित बैठकीत कोरोना संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या नावावर प्रत्येकी पाच लाख रुपयांची मुदत ठेव (एफडी) योजना राबविण्याच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. योजनेचा लाभ पात्र बालकांना वेळेत मिळावा तसेच त्यांचे शिक्षण, संगोपन आणि पुनर्वसन प्रभावीपणे व्हावे, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही मंत्री तटकरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस महिला व बालविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सरकारच्या या निर्णयामुळे कोविडमुळे अनाथ झालेल्या बालकांना शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी होण्यासाठी अधिक आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---------

### शासनाकडे पाहण्याचा नागरिकांचा दृष्टिकोन

अधिसूचित केलेल्या सेवांबाबत त्यांनी जिल्हास्तरीय आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव आणि आयोगाच्या उपसचिव अनुराधा खानविलकर यांच्यासह जिल्हास्तरीय विभागप्रमुख उपस्थित होते, तर तालुकास्तरावरून प्रांताधिकारी आणि तहसीलदार ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी डॉ. राठोड यांनी राज्य आयुक्तांचे स्वागत केले. निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी प्रास्ताविकासह जिल्ह्यातील सेवांचे संख्यात्मक सादरीकरण केले, तर जिल्हा समन्वयक संदीप पाटील यांनी जिल्हा डॅशबोर्डची माहिती दिली.

-----------

### चरणसेवेने वारकऱ्यांचा

चरणसेवा देण्यात आली. वारकऱ्यांच्या पायांना आयुर्वेदिक औषधी तेलाने मालिश करण्यात आल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण व थकवा कमी होण्यास मदत झाली. त्यामुळे पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवचैतन्य लाभले. यावेळी वारकऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामध्ये मातोश्री आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील ३० डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वारकऱ्यांना सेवाभावाने आरोग्य तपासणी, औषधोपचार व चरणसेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अहिल्यानगर मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे डॉ. रेहान शाह आणि स्वप्नील कच्छवे यांनी संबंधित संस्थेशी समन्वय साधून नियोजन व आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संतोष घाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

--------------

### बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी

आले आहे. या क्रीडा संकुलाकरिता यापूर्वी ८ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला होता. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून सादर करण्यात आलेल्या २४.९९ कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती तसेच राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मंजुरीच्या अनुषंगाने, ३१ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये २५ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला आहे.

--------------

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला

पुढील १५ दिवसांत सादर करण्याचे कडक निर्देश त्यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलाच्या जागेबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य त्या सूचना केल्या. परळी येथील तालुका क्रीडा संकुलासाठी महानिर्मितीच्या अर्थात परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ताब्यातील जमीन उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा करण्याचे व त्यासंबंधीची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# योजना पूर्ण करून शहरवासीयांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करा-मुख्यमंत्री फडणवीस

## छत्रपती संभाजी नगर पाणीपुरवठा योजना आढावा बैठक



मुंबई प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर वासियांना पुरेपूर पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. या योजनेचे काम गतीने पूर्ण करून शहरवासीयांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी याबाबत आयोजित बैठकीत दिले.

बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार डॉ. भागवत कराड उपस्थित होते तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी बैठकीत सहभाग घेतला.

बैठकीत पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव पराग जैन यांनी सादरीकरण केले. बैठकीस संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती अध्यक्ष अनिल मकरिये, अपर मुख्य सचिव (नगर विकास) के. गोविंदराज, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव नायक, महापालिका आयुक्त अमोल येडगे, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महानगर आयुक्त जी. श्रीकांत आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी बैठकीत सहभाग घेतला.



## एसआयआर गणना फॉर्म डिजिटलायझेशन वेळेत पूर्ण करा-डॉ. मैनाक घोष

**सांगली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी २८१-मिरज विधानसभा मतदारसंघात घेतला. यावेळी गणना फॉर्मच्या डिजिटलायझेशनचे काम आयोगाच्या सूचनांनुसार विहित वेळेत व अचूकपणे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गणना फॉर्मच्या डिजिटलायझेशनचे काम निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी सर्व सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी, बीएलओ पर्यवेक्षक तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी यावेळी दिले.

## वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते 'भारत टेक्स'मधील महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन






**नवी दिल्ली प्रतिनिधी**

**नवी दिल्लीतील प्रगती मैदान येथील भारत मंडपममध्ये आयोजित करण्यात आलेल्या देशातील सर्वात मोठ्या जागतिक वस्त्रोद्योग प्रदर्शन 'भारत टेक्स २०२६' मध्ये वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यंदा महाराष्ट्राचा भागीदार राज्य (पार्टनर स्टेट) म्हणून या प्रतिष्ठित प्रदर्शनात सहभाग असून, राज्याच्या वस्त्रोद्योग क्षेत्रातील क्षमता, परंपरा आणि आधुनिकतेचा संगमाचे दर्शन या दालनातून होत आहे.**

वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशू सिन्हा, महाराष्ट्र शासनाच्या नवी दिल्लीतील निवासी आयुक्त श्वेता सिंघल, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, उपसचिव श्रीकृष्ण पवार, रेशीम विभागाचे उपसचिव तुषार पवार,श्री.अशोक स्वामी यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि विविध उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीदिनी अभिवादन कार्यक्रम



**मुंबई । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. २२ जुलै रोजी जयंती निमित्त राज्यभर कार्यक्रम परिपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांची जयंती २२ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी राज्यभरात साजरी केली जाणार आहे. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाईल. हा आदेश राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांसह सर्व शाळा व महाविद्यालयांनाही लागू करण्यात आला आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या भागातील सर्व यंत्रणांमध्ये या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे निर्देश साप्रविच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## जिल्ह्यांच्या गरजेनुसार नवीन राज्य महिलागृहे उभारणार-आदिती तटकरे

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महिलांच्या सुरक्षितता आणि सक्षमीकरणाला अधिक बळ देण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन शक्तीसदन आणि राज्य महिलागृह उभारण्याचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात महिला संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या शक्तीसदन योजनेचा तसेच राज्य शासनाच्या राज्य महिलागृह योजनेचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी महिला व बालविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मंत्री तटकरे यांनी ज्या जिल्ह्यांमध्ये शक्तीसदन किंवा राज्य महिलागृहाची सुविधा उपलब्ध नाही, त्या जिल्ह्यांना प्राधान्य देऊन नवीन महिलागृहे उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. महिलांना सुरक्षित निवारा, समुपदेशन, पुनर्वसन आणि सक्षमीकरणाच्या सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या संरक्षणासाठी राज्यभरात आवश्यक त्या ठिकाणी सुविधा वाढविण्याबरोबरच योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## महसूल कामकाजात पारदर्शकता आणा; खाजगी हस्तक्षेप खपवून घेणार नाही - जिल्हाधिकारी जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हा नियोजन सभागृहात महसूल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेत पारदर्शक, जनहिताभिमुख व उत्तरदायी प्रशासनावर भर दिला. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, आश्विनी सोनावणे, निवासी उपजिल्हाधिकारी सतिश सोनी तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते.**

कार्यालयीन कामकाजात खाजगी व्यक्तींचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, तसेच शासकीय युजर आयडी व डिजिटल स्वाक्षरी कोणालाही देऊ नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतीही रक्कम आकारू नये, अवैध गौण खनिज उत्खननावर कारवाई वाढवावी, तसेच छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान, ई-फेरफार, उन्हाळी ई-पीक पाहणी, नवीन वाळू घाट प्रस्ताव, एसआयआर, डीबीटी व ई-केवायसीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## ज्वारी खरेदीला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ; शेतकऱ्यांना दिलासा

**जळगाव । प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून किमान आधारभूत किमतीअंतर्गत ज्वारी खरेदीची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) ज्वारी विक्रीची आणखी संधी उपलब्ध झाली आहे.**

ज्वारी खरेदीस मुदतवाढ मिळावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष रोहित निकम, संचालक मंडळ व प्रशासनाने राज्य आणि केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यानंतर ज्वारी खरेदीस ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावळ, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या मार्गदर्शनाखाली पणन महासंघाने केंद्र शासनाकडे याबाबत विशेष विनंती केली होती. केंद्र शासनाने ही विनंती मान्य केली असून, यासंदर्भातील अधिकृत आदेश प्रसिद्ध करण्यात आले आहेत. खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्र शासनाच्या पत्रातील सर्व अटी व शर्तींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी एस. एस. मेने यांनी दिली.

## जळगाव जिल्ह्यातील आठ तलाव मासेमारी ठेक्यासाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु

**जळगाव । प्रतिनिधी**

**जळगाव जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आणि मासेमारी ठेक्याची मुदत दि. ३० जून २०२६ रोजी संपुष्टात येणाऱ्या आठ तलाव व जलाशयांचा पुढील पाच वर्षांसाठी नव्याने मासेमारी ठेका देण्याचे प्रस्तावित आहे.**

शासन निर्णय दि. ३ जुलै २०१९ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे हे तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहेत. यामध्ये को. प. बंधारा (४४.९७ हे.), शहापूर (४७.०० हे.), खडकेसिम (३०.०० हे.), लोणीसिम (३५.३६ हे.), शेळावे (२७.०० हे.), दहीगाव बंधारा (२३९ हे.), शिरसमणी (७३.०० हे.) आणि आर्डी (३१.०० हे.) या आठ तलावांचा समावेश आहे. ई-निविदा प्रक्रियेबाबतचा सविस्तर तपशील http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मत्स्यव्यवसाय सहकारी संघ/मच्छीमार/मत्स्य-संवर्धक/खाजगी उद्योजक / खाजगी व्यक्ती यांनी सदर तलाव मासेमारी ठेक्याने मिळणेसाठी ई निविदा सादर करावी असे आवाहन अ.रा. पाटील, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय , जळगाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## नौदल प्रमुख कृष्णा स्वामीनाथन यांनी घेतली राज्यपालांची भेट



मुंबई प्रतिनिधी

भारतीय नौसेनेचे नवनियुक्त प्रमुख डमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

यावेळी राज्यपालांनी डमिरल स्वामीनाथन यांचे नौदल प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबददल अभिनंदन केले, तसेच स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला.

## मिरज शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक सुविधांचे लोकार्पण; 'नशामुक्त सांगली' अभियानाचा शुभारंभ





**सांगली । प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथे अत्याधुनिक लाँड्री विभाग आणि मेल सर्जिकल सेमी आयसीयूचे लोकार्पण राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याचवेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सांगली पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त सांगली' अभियानालाही प्रारंभ करण्यात आला.

याप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी जनजागृतीची गरज अधोरेखित केली. नव्याने सुरू झालेल्या सुविधांमुळे रुग्णांना अधिक दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा मिळणार असून रुग्णालयाची सेवा क्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रियांका राठी, पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. रूपेशकुमार शिंदे, महानगरपालिका गटनेते संदीप आवटी, नगरसेवक निरंजन आवटी, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दीपक शिंदे-म्हैशाळकर तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
शिव वाणी
विविधा
3
सोमवार, दि.२० जुलै २०२६
Monday, Dt. 20 july 2026

## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...



### ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाला’ अधिक बळ

मुंबई : राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये पारदर्शक, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख प्रशासनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेतला आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना विशेष प्रोत्साहन, आर्थिक सहाय्य आणि गौरव देण्यात येणार आहे. स्वच्छता, पाणीपुरवठा, डिजिटल प्रशासन, महिला सक्षमीकरण आणि ग्रामविकासातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्राधान्य दिले जाणार असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला यामुळे गती मिळणार आहे.



### शेतकऱ्यांसाठी सिंचन प्रकल्पांना गती; निधी वितरणाला मंजुरी

मुंबई : राज्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील पाणीटंचाईग्रस्त भागांना याचा मोठा लाभ होणार आहे. सिंचनक्षेत्रात वाढ, शेती उत्पादनात सुधारणा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा या निर्णयाचा प्रमुख उद्देश आहे. जलसंधारण आणि पाण्याच्या कार्यक्षम वापरावरही शासनाने भर दिला आहे.



### राज्यातील रस्ते विकासासाठी नव्या कामांना मंजुरी

मुंबई : राज्यातील राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांसह जिल्हा रस्त्यांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने विविध प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती, नवीन पूल उभारणी आणि वाहतूक सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी या निर्णयामुळे मोठी मदत होणार असून उद्योग आणि पर्यटनालाही चालना मिळेल.



### शासकीय रुग्णालयांच्या आधुनिकीकरणासाठी मोठा निधी

मुंबई : राज्यातील जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशेष निधी मंजूर केला आहे. नव्या वैद्यकीय उपकरणांची खरेदी, आयसीयू सुविधा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपलब्धता आणि रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे.



### महिलांच्या स्वयंसहाय्य गटांना आर्थिक बळ देण्याचा निर्णय

मुंबई : महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजनांअंतर्गत कर्ज, प्रशिक्षण आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, लघुउद्योगांना चालना देणे आणि महिला सक्षमीकरणाला गती देणे हे या निर्णयाचे उद्दिष्ट आहे. शासनाच्या या उपक्रमामुळे हजारो महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला होणार आहे.




### विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनांचा विस्तार, पात्र लाभार्थ्यांना दिलासा

मुंबई : आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागासवर्गीय आणि गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने विविध शिष्यवृत्ती योजनांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ करण्याबरोबरच शिष्यवृत्तीचे वितरण वेळेत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण आणि वंचित भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे, तसेच शिक्षणातील गळती रोखणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश असल्याचे शासनाने स्पष्ट केले.

# स्मार्ट प्रकल्पांना बांधकाम मंजुरी व फायर ‘एनओसी’बाबत तातडीने कार्यवाही करा -कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विविध उपप्रकल्पांना बांधकाम मंजुरी व फायर ‘एनओसी’ मिळण्यात येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.**

मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत चंद्रपूर येथील साखरवाही शेतकरी उत्पादक कंपनी (ता. चंद्रपूर) यांना मंजूर प्रकल्प कापूस जिनिंग या स्मार्ट प्रकल्पांमधील प्रलंबित बांधकाम परवानग्या व फायर एनओसीच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आमदार किशोर जोरगेवार, कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप चंद्रन, कृषी विभागाचे उपसचिव यू एस.कचरे, साखरवाही शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक नामदेव डाहुली उपस्थित होते.





### मच्छिमारांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक संपर्क व्यवस्था उभारणीवर भर – मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

मुंबइः राज्यातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तात्काळ मदत मिळावी आणि हवामान तसेच सुरक्षा सूचना वेळेवर प्राप्त व्हाव्यात, यासाठी सॅटेलाइट फोन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्यव्यवसाय विभागाने भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करून बीएसएनएल ग्लोबल सॅटेलाईट फोन सर्व्हिसची माहिती घेतली असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मंत्रालयात आयोजित बैठकीस मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, बीएसएनएलचे वरिष्ठ व्यवस्थापक सुहास मानकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### नगरपरिषद व नगरपंचायतीतील सेवाप्रवेश नियमांचा प्रस्ताव शासनाकडे तातडीने सादर करावे –राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे निर्देश

मुंबई : राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक पावले उचलत सेवाप्रवेश नियम संविधानाच्या अनुच्छेद ३०९ अन्वये सुधारित करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या समस्यांबाबत आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

बैठकीस आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालयाचे संचालक अभिषेक कृष्णा व इर मंत्रालयीन अधिकारी तसेच नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेचे प्रतिनिधी, महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

### मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबईः मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील मातंग समाजातील मांग, मातंग, मिनी मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या १२ पोटजातीतील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या व २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १० वी, १२ वी. पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकडून सरासरी ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती करीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

## आजऱ्यात होणार हत्ती संगोपन केंद्र, पर्यटनालाही मिळणार मोठी चालना

**पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते घाटकरवाडी येथे बोटिंग प्रकल्पाचे उद्घाटन**



**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**आजरा तालुक्यातील जंगली हत्तींचा वावर आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे अतोनात नुकसान हा अनेक वर्षांपासूनचा चिंतेचा विषय आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आजरा तालुक्यात लवकरच 'हत्ती संगोपन केंद्र' (हत्ती कॅम्प) उभारण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. ते आजरा तालुक्यातील घाटकरवाडी येथे जलसंधारण विभागाच्या तलावात नव्याने सुरू करण्यात आलेल्या बोटिंग प्रकल्पाच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते.**

एका बाजूला नयनरम्य तलावातील बोटिंग आणि दुसऱ्या बाजूला हत्ती संगोपन केंद्र, या दुहेरी आकर्षणामुळे भविष्यात घाटकरवाडी हे पर्यटनाचे एक मोठे 'स्पॉट' (केंद्र) म्हणून नावारूपाला येईल. हत्ती कॅम्प पाहण्यासाठी हजारो पर्यटक येथे भेट देतील, ज्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि परिसराचा आर्थिक विकास होईल, असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आणि पर्यटनाच्या या नव्या ओळखीसाठी पुढाकार घेणारे जलसंधारण विभागाचे अधिकारी, गुंतवणूकदार आणि ग्रामस्थ यांचे पालकमंत्र्यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महसूल सेवा नागरिकांच्या दारी; रायगडमध्ये २२ जुलैपासून महाराजस्व समाधान शिबिर



**रायगड–अलिबाग । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी, न्यायनिष्ठ आणि जनहितैषी कार्यातून प्रेरणा घेत महाराष्ट्र शासनाने महसूल विभागातील प्रलंबित प्रश्नांचा जलद व पारदर्शक निपटारा करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान हाती घेतले आहे.

रायगड जिल्ह्यात हे अभियान दि. २२ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावाजवळच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.महसूल मंत्री तथा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनतेच्या प्रश्नांचा तात्काळ निपटारा करण्याचा संकल्प तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने राज्यभर हे जयंती सप्ताह शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

## मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी १७ ऑगस्टपर्यंत अर्ज करा

**लातूर । प्रतिनिधी**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.**

या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरून निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. लातूर जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र बचत गटांकडून सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र बचत गटांनी आपले अर्ज पूर्ण भरून येत्या १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन लातूर समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## महसूल समाधान शिबिरासाठी सूक्ष्म नियोजन करा : जिल्हाधिकारी विसपुते




धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यात आयोजित करण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपजिल्हाधिकारी (प्रशासन) संदीप पाटील, उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, बालाजी क्षीरसागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, तहसीलदार प्रवीण चव्हाणके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गिरीष पाटील, कृषी विकास अधिकारी कावेरी राजपूत आदी उपस्थित होते.

## विविध घटकांना मध केंद्र योजनेसाठी आवाहन

**बीड (जिमाका)**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यात १८ जून २०१९ पासून मध केंद्र योजना (मधुमक्षिकापालन) राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत बीड जिल्ह्यातील पात्र व्यक्ती आणि संस्थांकडून लाभासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, युवक, युवती आणि संस्थांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी.व्ही. फताटे यांनी केले आहे.**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मध केंद्र योजना (मधुमक्षिकापालन) अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकरी, युवक आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेद्वारे लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्यासाठी ५० टक्के अनुदान आणि उत्पादित मधाला शासनाचा हमीभाव दिला जाईल. इच्छुक वैयक्तिक मधपाळांचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे आणि शेती असलेल्यांना प्राधान्य मिळेल. प्रगतीशील मधपाळ किंवा संस्थांना केंद्रचालक म्हणून सहभागी होता येईल. यासाठी दहावी उत्तीर्ण असणे, १ एकर जमीन किंवा १००० चौ. फुटांची इमारत असणे आवश्यक आहे. निवड झाल्यानंतर प्रशिक्षणापूर्वी मंडळाला बंधपत्र लिहून देणे अनिवार्य राहील. अधिक माहिती व अर्जासाठी जिल्हा ग्रामोद्योग कार्यालय, बीड किंवा भागवत रुपनर (९४२००१६२७९) यांच्याशी संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

### अंबाबाई मंदिरातील पाणीगळती तात्पुरती : पुरातत्त्व विभाग

कोल्हापूर । प्रतिनिधी

श्री महालक्ष्मी/ अंबाबाई मंदिरात राज्य शासनाच्या मंजूर जतन-संवर्धन आराखड्यांतर्गत वैज्ञानिक पद्धतीने कामे सुरू आहेत. या कामांमध्ये मंदिराच्या मूळ वास्तुशैलीचे जतन, पारंपरिक साहित्याचा वापर आणि पुरातत्त्वीय तत्त्वांचे काटेकोर पालन करण्यात येत आहे. मंदिरातील काही भागात झालेली पाणीगळती ही जतन-संवर्धनाच्या कामाच्या गुणवत्तेचे अपयश नसून, नियोजित वॉटरप्रूफिंगचे काम पूर्ण होण्यापूर्वी पावसाळा सुरू झाल्यामुळे निर्माण झालेली तात्पुरती परिस्थिती असल्याचे पुरातत्त्व विभागाने स्पष्ट केले आहे.

## नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा– कामगार मंत्री ॲड. फुंडकर



**मुंबई। प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगारांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे, त्यांच्या सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देणे आणि त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने मंडळाच्या ४ प्रमुख कल्याणकारी योजनांमध्ये सामाजिक सुरक्षा संहिता २०२० नुसार महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित तरतुदींनुसार कामगारांना मिळणाऱ्या लाभ रकमेत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री ड आकाश फुंडकर यांनी दिली.

### पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

कोल्हापूर। प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६-२७ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्ह्यातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी होऊन नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानीपासून संरक्षण मिळवावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक जालिंदर पांगरे यांनी केले आहे.

## बळीराजाच्या बांधावर जिल्हाधिकारी, चिखलणीसह केली भात रोपलावण



**कोल्हापूर । प्रतिनिधी**

पाय चिखलात हातात भाताची रोपे आणि सोबत शेतकरी व अधिकारी पन्हाळा तालुक्यातील बांदिवडे येथे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी स्वतः शेतात उतरून चिखलणी केली आणि चारसूत्री पद्धतीने भाताची रोपे लावली. निमित्त होते जिल्हा प्रशासनाच्या ‘माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी’ या उपक्रमाचे.

दिवसभर शेतकऱ्यांच्या बांधावर फिरत त्यांनी शेतीतील प्रयोग पाहिले, शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि सेंद्रिय शेतीपासून आधुनिक एआय तंत्रज्ञानापर्यंत विविध विषयांवर त्यांच्याशी थेट संवाद साधला.या प्रसंगी तहसीलदार माधवी शिंदे, गटविकास अधिकारी सोनाली माडकर, उपविभागीय कृषी अधिकारी पाटील, नायब तहसीलदार विजय जाधव, तालुका कृषी अधिकारी काव्यश्री घोलप, मंडल कृषी अधिकारी अभिलाषा गायकवाड, सुहास पाटील यांच्यासह कृषी, आत्मा व उमेद विभागाचे अधिकारी-कर्मचारी, दोन्ही गावांचे सरपंच आणि शेतकरी उपस्थित होते.

## वनमहोत्सव २०२६ : सवलतीच्या दरातील रोपांचा लाभ घ्या, वृक्षलागवड करा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

**वनमहोत्सव २०२६ निमित्त सामाजिक वनीकरण विभागातर्फे जिल्हाभर सवलतीच्या दरात रोपविक्री सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी हरित बीड, समृद्ध बीड तसेच एक पेड माँ के नाम अभियानात सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व संवर्धन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात विवेक जॉन्सन यांच्या हस्ते रोपविक्री स्टॉलचे उद्घाटन झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावाड, सहायक वनसंरक्षक उमेश बिराजदार, वनपरिक्षेत्र अधिकारी समाधान सानप उपस्थित होते. उमेश बिराजदार यांनी यंदा सुमारे २० लाख रोपे तयार करण्यात आली असून नीम, वड, पिंपळ, साग, आवळा, पेरू, सिताफळसह ४० ते ५० स्थानिक प्रजाती उपलब्ध असल्याची माहिती दिली. श्रीनिवास लखमावाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बीएसएनएल परिसर तसेच जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांतील रोपविक्री केंद्रांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

SHIV VANI
शिव वाणी
क्रीडा, न्यायनिवाडा, क्राईम घडामोडी...
सोमवार, दि.२० जुलै २०२६
Monday, Dt. 20 july 2026

# महाराष्ट्रासह देशभर खळबळ; डॉक्टर आंदोलनापासून नक्षल कारवाईपर्यंत घडामोडी












**डॉक्टरांवरील हल्ल्याने संताप; राज्यभर २४ तास ओपीडी बंद**
डोंबिवली : डॉक्टरवर झालेल्या हल्ल्यानंतर इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र शाखेने राज्यभर २४ तास ओपीडी सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे आणि संरक्षणाची मागणी करण्यात आली असून या घटनेने आरोग्य क्षेत्रात चिंता व्यक्त केली जात आहे.

**कल्याणमध्ये सराईत गुन्हेगाराची भररस्त्यात हत्या**
जामिनावर बाहेर आलेल्या सराईत गुन्हेगाराची भररस्त्यात निर्घृण हत्या कल्याण : खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर बाहेर आलेल्या एका सराईत गुन्हेगारावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी हल्ला करून त्याची हत्या केली. हल्ल्यात त्याच्यासोबत असलेली महिला जखमी झाली. या घटनेमुळे कल्याण परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

**प्रेमभंगाची शोकांतिका; तरुणीच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांचा संताप**
मुंबई : आठ वर्षांच्या प्रेमसंबंधानंतर विवाहास नकार मिळाल्याने एका तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली. मृत्यूनंतर तिच्या कुटुंबीयांनी मृतदेह प्रियकराच्या घरी नेऊन मंगळसूत्र घालून अंत्यविधी करण्याची मागणी केल्याने प्रकरणाची राज्यभर चर्चा झाली.

**नवविवाहितेच्या मृत्यूप्रकरणी पतीसह सात जणांवर गुन्हा**
अकोला : नवविवाहित महिलेच्या संशयास्पद मृत्यूनंतर पोलिसांनी पतीसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कौटुंबिक छळ आणि मानसिक त्रासामुळे आत्महत्येचा संशय व्यक्त होत असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**कर्नाटकात महाराष्ट्रातील मजुराचा खून**
बागलकोट : महाराष्ट्रातील एका मजुराचा कर्नाटकातील शाळेच्या परिसरात मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. पोलिसांनी हत्या झाल्याचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत.

**गडचिरोलीत मोठी कारवाई; चकमकीत १२ नक्षलवादी ठार**
गडचिरोली : महाराष्ट्र– छत्तीसगड सीमेवरील जंगलात सुरक्षा दलांनी केलेल्या मोठ्या कारवाईत सुमारे १२ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती समोर आली. घटनास्थळावरून शस्त्रास्त्रेही जप्त करण्यात आली असून ही कारवाई नक्षलवादाविरोधातील मोठे यश मानली जात आहे.

**पटना पोलिसांचा धडाका; १५८ आरोपी अटकेत**
पटना : गुन्हेगारी आणि अवैध दारूविक्रीविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत पटना पोलिसांनी तब्बल १५८ जणांना अटक केली. अनेक ठिकाणी छापे टाकून गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे गुन्हेगारीविरोधातील पोलिसांचा कठोर संदेश गेला आहे.

**संघटित गुन्हेगारीविरोधात भारताचा कठोर संदेश**
नवी दिल्ली : आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटित गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवण्याची भूमिका भारताने स्पष्ट केली आहे. परदेशातील एका गाजलेल्या हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारताने जागतिक सहकार्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली.

## ग्रामीण विकासाला गती; विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही-मंत्री जयकुमार गोरे

### मिरज पंचायत समितीच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण



सांगली । प्रतिनिधी

**मिरज तालुका पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार, पारदर्शक आणि जलद शासकीय सेवा उपलब्ध होतील. उर्वरित कामे व विकास कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी आज केले.**

मिरज पंचायत समितीच्या नूतन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री व आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सदाभाऊ खोत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, माजी आमदार दिनकर पाटील, मिरजचे प्रभारी गटविकास अधिकारी किरण सायमोते, सहायक गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर मडके आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रभारी गटविकास अधिकारी किरण सायमोते यांनी तर ज्ञानेश्वर मडके यांनी आभार मानले. विजय कडणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास महापालिकेचे गटनेते निरंजन आवटी, जिल्हा बँकेचे संचालक बाळासाहेब होनमोरे, पृथ्वीराज पाटील, अरविंद तांबवेकर, आमदार सुरेश खाडे यांच्या सुविद्य पत्नी सुमन खाडे, जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन पंचायत समिती प्रशासनाने केले.

## पालकमंत्री थेट शेताच्या बांधावर; चिखलात उतरून केली भात लावणी

### जिल्ह्यात ३०० गावांमध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासन शेतकऱ्यांच्या दारी



कोल्हापूर/आजरा । प्रतिनिधी

**बळीराजाच्या अडीअडचणी आणि शेतीचे प्रश्न थेट बांधावर जाऊन समजून घेण्यासाठी कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज एक आगळावेगळा पुढाकार घेतला. 'एक दिवस बळीराजासाठी' या विशेष उपक्रमांतर्गत आजरा तालुक्यातील मसोली येथे चिखलात उतरून पालकमंत्र्यांनी स्वतः रोटावेटर चालवत चिखलणी केली, तसेच पारंपरिक पद्धतीने भात रोपलावणी व बांधबंदिस्तीच्या कामात प्रत्यक्ष सहभाग घेतला.**

पालकमंत्र्यांच्या या उपक्रमामुळे आज विविध लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनाचे अधिकारी जिल्ह्यातील तब्बल ३०० गावांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले होते.जिल्ह्यात सध्या पावसाळी हंगामातील भातशेतीची कामे अंतिम टप्प्यात असून, लावणीला वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मसोली येथील शेतकरी सुरेश होडगे यांच्या शेताला भेट दिली. केवळ औपचारिक भेट न देता, पालकमंत्र्यांनी थेट भातखाचरात उतरून चिखलणीच्या कामात रोटावेटर चालवला. त्यानंतर हातात भाताची रोपे घेत महिला भगिनी व शेतकऱ्यांच्या सोबतीने पारंपरिक पद्धतीने रोपलावण केली. शेताचे बांध मजबूत करण्याच्या कामातही त्यांनी हातभार लावला. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन थेट आपल्यासोबत चिखलात काम करत असल्याचे पाहून स्थानिक शेतकऱ्यांमध्येही कमालीचा उत्साह दिसून आला.

## होमिओपॅथी, आयुर्वेद, योगा महाविद्यालयांच्या सुविधा तातडीने उभारा - मंत्री हसन मुश्रीफ



**कोल्हापूर प्रतिनिधी**

मौजे सांगाव येथील शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, पिंपळगाव खुर्द येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, उत्तूर येथील शासकीय योगा व निसर्गोपचार महाविद्यालय व रुग्णालय तसेच कागल येथील ग्रामीण आरोग्य पथक परिसरातील पाणी, वीज, रस्ते व एसटीपीसह अत्यावश्यक सुविधा जलदगतीने उभारण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

शेंडा पार्क येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आढावा बैठकीत त्यांनी सर्व कामे दर्जेदार व मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस डॉ. सदानंद भिसे, डॉ. अभिजीत अहिरे, डॉ. भाग्यश्री खोत, तुषार बुरूड, श्री. मिरजकर, श्री. हजारे, श्री. तायवाडे-पाटील आणि श्री. शेळके उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यातील ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

लातूर प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील मुदत संपलेल्या आणि आगामी काळात मुदत संपणाऱ्या एकूण ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी हा निवडणूक मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी कळविले आहे.

या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करताना १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी वापरण्यात यावी, असे निर्देश निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाले आहेत. या कार्यक्रमानुसार शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. या प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना आपल्या हरकती व सूचना दाखल करण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ ते बुधवार, २९ जुलै २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सर्व हरकती व सूचनांचा योग्य विचार करून मंगळवार, ०४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. नागरिकांनी व इच्छुकांनी विहित मुदतीत मतदार यादीची पडताळणी करून घ्यावी आणि आवश्यक असल्यास आपल्या हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# राम मंदिर देणगी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा दणका







## आठवडाभरात अहवाल सादर करण्याचे आदेश

नवी दिल्ली : अयोध्या राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत उत्तर प्रदेश सरकारच्या विशेष तपास पथकाला (डखढ) एका आठवड्यात स्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. केंद्र सरकार आणि संबंधित ट्रस्टलाही भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे. या आदेशामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले असून देशभरात त्याची चर्चा सुरू आहे.

**डोंबिवली डॉक्टर मारहाण प्रकरण; शिवसेना नगरसेवकाला न्यायालयाकडून जामीन**
कल्याण : डोंबिवलीतील डॉक्टर आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांवरील हल्ला प्रकरणात अटक करण्यात आलेल्या शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांना स्थानिक न्यायालयाने ५० हजारांच्या रोख जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर डॉक्टर संघटनांनी नाराजी व्यक्त केली असून डॉक्टरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

**आसाम सरकारला सर्वोच्च न्यायालयाची फटकार, दोन आठवड्यांत उत्तर सादर करा**
नवी दिल्ली : पाच महिलांना परदेशी नागरिक घोषित करण्याच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयाने आसाम सरकारला दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारला निर्णयाचा आधार स्पष्ट करण्यास सांगण्यात आले असून या प्रकरणाकडे देशभरातील कायदेतज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.

**बाल लैंगिक अत्याचार प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाचा संताप**
बंगळुरू : तब्बल १२ वर्षे प्रलंबित असलेल्या बाल लैंगिक अत्याचार प्रकरणावर कर्नाटक उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत खटल्याचा निकाल आठ आठवड्यांत देण्याचे आदेश दिले. विलंबित न्याय ही गंभीर बाब असल्याचे न्यायालयाने स्पष्ट करत यंत्रणांना फटकारले.

**मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वाच्या प्रकरणांवर निर्णय अनेक याचिकांचा निपटारा**
मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाने या आठवड्यात सहकारी संस्था, गृहनिर्माण, महसूल आणि प्रशासकीय विषयांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या याचिकांवर निर्णय देत प्रकरणांचा निपटारा केला. विविध नागरी व फौजदारी प्रकरणांवरील आदेशांमुळे अनेक प्रलंबित वादांना दिशा मिळाली आहे.

**दोन अपत्यांच्या अटीवर सर्वोच्च न्यायालयाची कठोर टिप्पणी, ग्रामपंचायत निवडणूक प्रकरण गाजले**
नवी दिल्ली : बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दोन अपत्यांच्या अटीवर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ग्रामीण महिलांवर या अटीचा अन्यायकारक परिणाम होत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या प्रकरणामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत मोठी चर्चा सुरू झाली आहे.

**धारावी पुनर्विकासाला दिलासा; सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार**
नवी दिल्ली : आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प असलेल्या धारावी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने प्रकल्पाला स्थगिती देण्यास नकार दिला. याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेत न्यायालयाने पुढील सुनावणी ठेवली. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या कामाला तात्पुरता दिलासा मिळाला असून राज्यभर या निकालाची चर्चा सुरू आहे.

**'बलात्कारपीडित मुलीवर उपचार नाकारणार नाही' – सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट मत**
नवी दिल्ली : लैंगिक अत्याचारग्रस्त अल्पवयीन मुलीच्या उपचारासंदर्भातील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने कोणताही डॉक्टर अशा पीडितेवर उपचार नाकारू शकत नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले. पीडितांना तातडीने वैद्यकीय मदत मिळणे हा त्यांचा कायदेशीर आणि मानवी हक्क असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

**बंगळुरू महापालिका निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा आदेश**
नवी दिल्ली : बंगळुरू महानगरपालिका निवडणुका ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक सरकारला दिले आहेत. मतदार यादी पुनरावलोकनामुळे मुदतवाढ देण्यात आली असली तरी निवडणूक वेळेत घेण्याचे आदेश कायम ठेवण्यात आले. या निर्णयाकडे देशभरातील निवडणूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा निकाल म्हणून पाहिले जात आहे.

### 'न्यायालयाचा न्याय निवाडा'

**शाळा-रुग्णालय परिसरात भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण; सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी**
मुंबई : शाळा आणि रुग्णालय परिसरात भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. संवेदनशील भागांत सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...




### तेजस शिर्सेवर राष्ट्राची नजर, राष्ट्रकुल स्पर्धेची जोरदार तयारी

मुंबई : औरंगाबादचा धावपटू तेजस शिर्से राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारताचा प्रमुख दावेदार मानला जात आहे. ११० मीटर अडथळा शर्यतीत सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याच्याकडून पदकाची अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्राच्या या खेळाडूने भारतीय अॅथलेटिक्समध्ये नवे स्थान निर्माण केले आहे.



### भारतात पुन्हा फॉर्म्युला-१ शर्यतीची हालचाल

नवी दिल्ली : भारतात २०२८ पर्यंत पुन्हा फॉर्म्युला-१ स्पर्धा आयोजित करण्यासाठी केंद्र सरकार आणि संबंधित संस्था प्रयत्नशील आहेत. बुद्ध इंटरनॅशनल सर्किटवर पुन्हा शर्यती आयोजित करण्यासाठी चर्चा सुरू असून मोटरस्पोर्टला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.



### भारत-इंग्लंड वनडे मालिकेतील निर्णायक सामन्याकडे लक्ष

लंडन : भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा व निर्णायक वनडे सामना लॉर्ड्सवर रंगणार आहे. मालिका जिंकण्यासाठी दोन्ही संघ सज्ज असून भारतीय संघाकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.



### रोहित शर्माच्या निवृत्तीच्या चर्चांना उधाण

लंडन : भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्मा याच्या वनडे निवृत्तीबाबत चर्चा रंगल्या आहेत. त्याचे आई-वडील लंडनमध्ये दाखल झाल्याने लॉर्ड्सवर त्याला भावनिक निरोप मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### विराट कोहलीच्या ४०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्याकडे जगाचे लक्ष

लंडन : भारतीय क्रिकेटचा स्टार फलंदाज विराट कोहली लॉर्ड्सवर आपल्या ४०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्याच्या उंबरठ्यावर आहे. या ऐतिहासिक टप्प्यामुळे क्रिकेटविश्वाचे लक्ष त्याच्याकडे लागले असून भारतीय चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.



### लंका प्रीमियर लीगमध्ये लाचलुचपत प्रकरण

कोलंबो : माजी युवा क्रिकेटपटू मंजोत कालरा याला लंका प्रीमियर लीगदरम्यान कथित लाचलुचपत प्रकरणात श्रीलंकेच्या पोलिसांनी अटक केली. या घटनेमुळे क्रिकेटमधील पारदर्शकतेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी-३ एम.आय.डी.सी.बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)